# पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य; जामखेडसाठी उजनीचे अतिरिक्त पाणी मिळविण्यासाठी प्रयत्न
## अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष गावात जाऊन काम करण्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचे निर्देश


साप्ताहिक दर्शक

E-mail : weeklydarshak@gmail.com    R.N.I.NO.MAH/MAR/2000/02266

वर्ष ४२ | अंक नं - ७ | पाने ४ | सोमवार २८ सप्टेंबर २०२६ | किंमत २ रु


अहिल्यानगर दि ०१ (जिमाका) दुष्काळसदृश्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पाणी, चारा आणि शेतीच्या नुकसानीबाबत प्रशासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात. गावपातळीवर टँकरचे नियोजन करताना लोकप्रतिनिधींची मते जाणून घेऊन गावनिहाय आराखडा तयार करावा. तसेच पात्र शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहणार नाही, यासाठी शेतीच्या नुकसानीचे पंचनामे विहित वेळेत पूर्ण करावेत, असे निर्देश पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.श्रीगोंदा मतदारसंघातील दुष्काळसदृश्य परिस्थिती तसेच चारा व पाणीटंचाईबाबत पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली श्रीगोंदा येथे आढावा बैठक झाली. आमदार विक्रम पाचपुते, अपर



जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, जिल्हा कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व स्थानिक पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी ग्रामीण भागातील गरजू गावांचा प्रत्यक्ष आढावा घेऊन टँकरचे वेळापत्रक निश्चित करावे. पाणीपुरवठा सुरळीत राहील याची जबाबदारी संबंधित यंत्रणांनी घ्यावी. तहसीलदार, गटविकास अधिकारी, कृषी अधिकारी आणि पशुसंवर्धन अधिकारी यांनी तालुक्याचा एकत्रित अभ्यास करून उपलब्ध पाणीसाठा व भविष्यातील गरज लक्षात घेऊन नियोजन करावे. महाराष्ट्र जल प्राधिकरणांतर्गत सुरू असलेली पाणीपुरवठ्याची कामेही गतीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. *पशुधनासाठी चारा उपलब्धतेचे नियोजन*दुष्काळात पशुधनाचे संरक्षणही महत्त्वाचे असल्याने गावनिहाय (पान २ वर)

# बिल मंजुरीसाठी लाचेची मागणी; सहायक अभियंता, उपअभियंता आरोपी

मुंबई : राज्यात एसीबीने (A C B) कारवाईचं धाडसत्र सुरुच ठेवलं असून मुंबई महापालिकेच्या गोवंडी पूर्व विभागातील दोघांविरुद्ध कारवाई केली आहे. गोवंडीतील एम-पूर्व विभागातील BMC च्या दोन अधिकाऱ्यांवर लाच मागणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक अभियंता गणेश हनमंतराव चांदोलकर आणि उपअभियंता अविनाश दत्तात्रय दुधभाते यांच्याविरुद्ध ही कारवाई करण्यात आली. तर, याप्रकरणात खासगी इसम विनीत खाडे याचाही आरोपींमध्ये समावेश आहे. पिंक आर्मी योजना आणि सार्वजनिक शौचालय स्वच्छतेच्या कामाचे बिल मंजूर करण्यासाठी तक्रारदाराकडे 3 लाख 50 हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. तक्रारदारा च्या तक्रारीनंतर ACB ने संबंधित आरोपीं विरुद्ध कारवाई सुरू केली असून पडताळणी दरम्यान चांदोलकर यांनी 2 लाख रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. उपअभियंता दुधभाते आणि खासगी इसम खाडे यांनीही लाचेची मागणी केल्याचे ACB चे म्हणणे आहे. खासगी इसमाने लाचेची रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शवली, त्यानुसार, तक्रारदाराने 5 मे रोजी लेखी तक्रार दिली होती. त्यानुसार, तिघांविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 मधील कलम 7, 7(अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपींची अंगझडती, वाहन/कार्यालय झडती, मोबाईल जप्ती आणि घरझडतीची कारवाई सुरू असून ACB मुंबई विभागाकडून तपास सुरू आहे.मुंबई महापालिकेच्या अग्निशमन दलातील दोन केंद्र अधिकाऱ्यांवर देखील ACB ने सापळा टाकला होता. हॉटेलच्या फायर परवान्यासाठी 2 लाखांची लाच मागितल्याचा आरोप संबंधित अधिकाऱ्यांवर करण्यात आला असून तडजोडीनंतर 1.50 लाख लाच स्वीकारण्याचे ठरल्याचे ACB च्या कारवाईत निष्पन्न झाले आहे. याप्रकरणात तक्रारदाराने यापूर्वीच 60 हजार दिल्याचे देखील तपासात समोर आले. फायर सर्टिफिकेटसाठी ऑनलाइन 9 हजारांचे टोकनही भरले होते.

# प्रल्हाद पाठक व शैलेश साबळे यांना 'उत्कृष्ट अभियंता पुरस्कार' प्रदान

नगर – महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने दिला जाणारा उत्कृष्ट अभियंता पुरस्कार २०२६ शेवगाव सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता प्रल्हाद अनंत पाठक व कनिष्ठ अभियंता शैलेश विष्णू साबळे यांना सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या हस्ते व राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांचे प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला.२९ सप्टेंबर रोजी मुंबई येथे समारंभ झाला.भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वे-श्वरय्या यांचा जन्मदिवस दरवर्षीअभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्ताने निवडक अभियंत्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने वैयक्तिक उत्कृष्ट अभियंता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. गौरव चिन्ह व प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. अभियंता पाठक व कनिष्ठ साबळे यांनी शेवगाव उपविभागात रस्ते, इमारती व पुलांची कामे नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून दर्जेदार व गुणवत्तेने केल्याने त्यांना उत्कृष्ट



उपविभागीय अभियंता प्रल्हाद पाठक यांचा सत्कार करताना उपअभियंता कांबळे, इंजि.सय्यद,पत्रकार रियाज शेख,प्रकाश थोरात.उपअभियंता सय्यद

अभियंता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमास सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सचिव (रस्ते) शरद राजभोग, सचिव (बांधकामे) आबासाहेब नागरगोजे तसेच प्रशांत औटी (सचिव प्रधानमंत्री /मुख्यमंत्री ग्रामसडक योजना), अरुंधती शर्मा (मुख्य अभियंता (सा.बां.प्रादेशिक विभाग नाशिक), विवेक माळुंदे (अधिक्षक अभियंता अहिल्यानगर), लक्ष्मीकांत जाधव व युवराज कोकरे (कार्यकारी अभियंता अहिल्यानगर) व मुख्य अभियंता, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# पक्षप्रवेशासोबतच काँग्रेसकडून अदिती पोहरे यांना उमेदवारी; अमरावती शिक्षक मतदारसंघात राजकीय हालचालींना वेग



अमरावती : महाराष्ट्र विधान परिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. काँग्रेसने या मतदार संघासाठी प्रा.अदिती ऋषिकेश पोहरे यांचे नाव पुढे केले असून, 1 ऑक्टोबर रोजी मुंबईत काँग्रेसमध्ये प्रवेशाच्या पार्श्वभूमीवर त्यांची उमेदवारी जाहीर होण्याची माहिती समोर आली आहे.अदिती पोहरे या माजी मंत्री **हर्षवर्धन देशमुख यांच्या कन्या** असून ज्येष्ठ पत्रकार तथा शेतकरी नेते **प्रकाश पोहरे यांच्या कुटुंबाशी** त्यांचा संबंध आहे. त्यांच्या काँग्रेस प्रवेशामुळे अमरावती विभागातील शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत राजकीय पक्षांच्या हालचाली आणखी वाढल्या आहेत. काँग्रेसकडून पहिल्या उमेदवाराच्या घोषणेकडे लक्ष अमरावती विभाग शिक्षक मतदार संघाची निवडणूक आता अधिकृत कार्यक्रमानुसार होत आहे. निवडणुकीची सूचना 29 सप्टेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून 23 ऑक्टोबर 2026 रोजी मतदान होणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत 6 ऑक्टोबर आहे, तर 9 ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे. 27 ऑक्टोबरला मतमोजणी होणार आहे.या पार्श्वभूमीवर काँग्रेसने अदिती पोहरे यांचे नाव पुढे केल्याने पक्षाच्या निवडणूक तयारीला अधिकृत स्वरूप मिळत असल्याचे चित्र आहे.

## पूर्णेकर कुटुंबीयांना उद्धव ठाकरेंचा आधार

ठाणे- ठाण्याच्या मानपाडा परिसरातील ठाकरे गटाचे विभागप्रमुख प्रदीप पूर्णेकर यांची मंगळवारी रात्री गोळ्या झाडून आणि कोयत्याने वार करुन निर्घृण हत्या करण्यात आली होती. मानपाडा परिसरात पूर्णेकरांना मानणारा मोठा वर्ग आहे. ठाणे हा एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असतानाही मानपाडा, मनोरमा नगर, आझाद नगर या परिसरात पूर्णेकरांच्या रुपाने ठाकरे गटाचा दबदबा होता. त्यामुळे प्रदीप पूर्णेकरांच्या हत्येने ठाकरे गटात खळबळ माजली होती. या पार्श्वभूमीवर बुधवारी उद्धव ठाकरे यांनी पूर्णेकर यांच्या घरी जात त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. सध्याच्या घडीला जे कराल ते शांत डोक्याने करा. भावनिक होऊन कुठलंही पाऊल उचलू नका, असा सल्ला उद्धव ठाकरे यांनी पूर्णेकर यांचा मुलगा आणि भावाला दिला.उद्धव ठाकरे यांनी प्रदीप पूर्णेकर यांच्या कुटुंबाला आधार देताना आम्ही शेवटपर्यंत तुमच्या सोबत राहू, असे आश्वासन दिले. उद्धव ठाकरे यांच्याशी बोलताना प्रदीप पूर्णेकर यांची पत्नी विजेता पूर्णेकर, मुलगा राम पूर्णेकर आणि मुलगी हे सर्वजण भावूक झाले होते.

## दादरानगर हवेली येथून आलेला बेकायदेशीर दारूचा साठा पकडला

नगर – दादरा नगर हवेली येथून बेकायदेशीर आणलेला दारूचा मोठा साठा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडला आहे. नेवासा तालुक्यातील सोनई पोलीस ठाण्याच्या हद्दीत करण्यात आलेल्या या कारवाईत १० लाख ८८ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या सूचनेनुसार पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड व पोलीस अंमलदार विजय ठोंबरे, विकास साळवे, अमृत आढाव व बाळासाहेब गुंजाळ अशांचे पथक २९ सप्टेंबर रोजी सोनई पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करत असताना, माहिती मिळाली की, प्रविण नानासाहेब धाडगे, राजेंद्र बापुराव जावळे आणि संदीप शिवाजी गायकवाड (सर्व रा. चांदा, ता. नेवासा) यांनी महाराष्ट्र राज्यात विक्रीस प्रतिबंध असलेली विदेशी दारू दादरा आणि नगर हवेली, दमण व दीव या केंद्रशासित प्रदेशातून कंटेनरने छुप्या मार्गाने आणली आहे. त्यातील काही विदेशी दारू संभाजी कचरू गायकवाड (रा. चांदा, ता. नेवासा) याच्या घरासमोर पांढऱ्या रंगाच्या मारुती ब्रिझा गाडीमधून विक्रीसाठी आणून ठेवण्यात आली आहे.मिळालेल्या या खबरीच्या आधारे पथकाने संबंधित ठिकाणी जाऊन खात्री केली असता, तिथे मारुती सुझुकी कंपनीची ब्रिझा कार (क्र. एमएच१२–एनयु–९१७७) आढळून आली. पंचांसमक्ष गाडीची व मालाची पाहणी केली असता, ५६,१६० रुपये किमतीच्या रॉयल स्टॅग कंपनीच्या १८०मिलीच्या ६२४ बॉटल, ३२,६४० रुपये किमतीच्या इम्पेरियल ब्लू कंपनीच्या ४८० मिलीच्या ३८४ बॉटल आणि १०,००,००० रुपये किमतीची एक ब्रिझा कार असा एकूण १०,८८,८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.जप्त केलेल्या मुद्देमालाबाबत संभाजी गायकवाड याच्याकडे अधिक चौकशी केली असता, त्याने हा साठा प्रवीण नानासाहेब धाडगे, राजेंद्र बापुराव जावळे आणि संदीप शिवाजी गायकवाड (सर्व रा. चांदा, ता. नेवासा) यांनी विक्रीसाठी आणून दिल्याची माहिती दिली. या प्रकरणी पाहिजे असलेल्या आरोपींचा शोध घेतला असता ते मिळून आले नाहीत. या सर्व आरोपींविरोधात सोनई पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(अ)(ई), ८३(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

## भिंगारच्या शुक्रवार बाजारात दुकानात चोरी; गुन्हा दाखल

नगर – भिंगार शहरातील शुक्रवार बाजार परिसरातील एका चपलेच्या दुकानात अज्ञात चोरट्याने कुलूप व कडी–कोंडा तोडून प्रवेश करत सुमारे ८ हजार रुपये किमतीचे विविध प्रकारच्या चपला, सँडल आणि बुटांचा साठा लांबवल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत शेनाज सईद बेग (वय ४४, रा. घर नं.३५०, सदर बाजार, भिंगार) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्या भिंगारमधील शुक्रवार बाजार येथील दुकानाचे कुलूप व कडी–कोंडा अज्ञात चोरट्याने २९ सप्टेंबर रोजी रात्री ९.३० वाजण्यापासून ते ३० सप्टेंबर रोजी सकाळी ७.३० दरम्यान तोडला. चोरट्याने दुकानातील विविध कंपन्यांच्या चपला, सँडल आणि बूट असा अंदाजे ८ हजार रुपये किमतीचा माल चोरून नेला. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ (२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस अंमलदार गारुडकर करत आहेत.

## माळीवाड्यातून महिलेची पर्स चोरणारे ३ आरोपी जेरबंद

नगर –माळीवाडा परिसरात शहरातील भरदिवसा फुलविक्री करणाऱ्या महिलेची ३० हजार रुपयांची रोकड असलेली पर्स चोरून पसार झालेल्या तीन संशयित आरोपींना कोतवाली पोलिसांनी अवघ्या २४ तासांच्या आत शोध घेऊन ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, गुन्ह्यात वापरलेली मोपेड गाडी व चोरीला गेलेला संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.माळीवाडा येथील श्री विशाल गणपती मंदिरा जवळील श्री दत्त फ्लॉवर डेकोरेटर दुकाना जवळून एका अज्ञात इसमाने अलका दत्तात्रय भुतारे यांची रोख ३० हजार रुपये असलेली पर्स २८ सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास चोरून नेली होती. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून कोतवालीचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी गुन्हे शोध पथकाला आरोपींचा लवकरात लवकर शोध घेण्याचे आदेश दिले होते.त्यानुसार कोतवालीच्या गुन्हे शोध पथकाने घटना स्थळाची पाहणी करून गुप्त माहिती दारामार्फत आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे कसून तपास केला. या तपासात सदर चोरी करणारा इसम व त्याचे इतर दोन साथीदार एका सुझुकी क्सेस मोपेड गाडीवरून (क्र. एमएच १६ डीक्यू ९६८९) पर्स चोरून पळून गेल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी अवघ्या चोवीस तासांच्या आत कारवाई करत तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले. चौकशी दरम्यान त्यांनी आपले नाव निखिल सुनील उल्हारे (वय १९), अनिकेत गोवर्धन पवार (वय २०) आणि यशोदास राजु शिंदे (वय २२, सर्व रा. देवी मंदिराच्या मागे, रामवाडी, अहिल्या नगर) असल्याचे सांगितले. तसेच त्यांनीच हा गुन्हा केल्याची कबुली दिली असून, त्यांच्याकडून गुन्ह्यातील चोरीस गेलेली पर्स, ३० हजार रुपयांची रोख रक्कम आणि गुन्ह्यात वापरलेली सुझुकी क्सेस मोपेड गाडी असा सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास महिला पोलीस अंमलदार वर्षा पंडित करत आहेत.ही कारवाई पोलीस अंमलदार विशाल दळवी, विनोद बोरगे, सुर्यकांत डाके, राहुलशिंदे, वर्षा पंडित, सुरज कदम, संकेत धिवर, अतुल लाटे, शिरीष तरटे, दत्तात्रय कोतकर, सचिन लोळगे, रमेश शिंदे, वैभव काळे, संदीप शेंडगे, राहुल गुंडू, अरुण सांगळे आदींच्या पथकाने केली

## संपादकीय......................................

# जिल्हा बँक निवडणुकीचा आखाडा

दुष्काळ जाहीर झाल्या पासून निवडणूक बिनविरोध करण्याचे आवाहन प्रस्थापित नेते मंडळाने केले ज्येष्ठ नेते यशवंतराव गडाख यांनी ही साद घातली आणि त्यानुसार बैठकही संपन्न झाली यात सर्वाधिक चर्चा ज्या बैठकीची झाली ती म्हणजे माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात आणि माजी खासदार सुजय विखे पाटील यांच्या बरोबर संगमनेर येथे झालेली जिल्ह्यातील आमदारांची ही बैठक इतकी गाजली कि आजच्या भाषेत खूप व्हायरल झाली याचे कारणही तसेच होते का म्हणजे यात अनेक मातब्बर दिग्गज नेते विरोधक जे कधी एकमेका सोबत दिसणे शक्य नाही ते यावेळी दिसले आणि एकमेकासोबत उपस्थित राहिले.यामध्ये सभापती प्रा राम शिंदे व खासदार निलेश लंके हे दिसले नाहीत मात्र शिंदेंना आमंत्रण असूनही ते गैरहजर राहिले असल्याची माहिती त्यांनीच दिली व मी थोरात यांच्या संपर्कात होतो असेही त्यांनी सांगितले त्यांनी व खासदार नीलेश लंके यांच्यासह आमदार मोनिका राजळे, आमदार काशिनाथ दाते, आमदार आशुतोष काळे, आमदार किरण लहामटे, चंद्रशेखर घुले, राजश्री घुले, वैभव पिचड, अमोल राळेभात, राजेंद्र नागवडे, करण ससाणे, ऋषिकेश ढाकणे यासह गुरुवार अखेर १०९ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत.अर्ज दाखल केल्यानंतर खा.लंके यांनी काही लोकांनी मनातील हेवेदावे दूर ठेवा तरच बिनविरोध बाबत काही विचार होऊ शकतो अन्यथा बिनविरोध निवडणूक न होता राष्ट्रवादी पूर्ण ताकदीने लढेल असा टोला विरोधकांना लगावला. विक्री झालेले अर्ज आणि दाखल होणाऱ्या अर्जाची संख्या पाहता बिनविरोध निवडणुकीची शक्यता धूसरच आहे उलट निवडणूक दाते विरुद्ध लंके विरुद्ध शेळके म्हणजेच काय तर महायुती विरुद्ध महाविकास आघाडी जणू अशीच होणार कि काय असे दिसतंय विविध ठिकाणच्या लढती अत्यन्त चुरशीच्या होणार आहेत व जिल्हा बँक निवडणुकीचा आखाडा हळूहळू तापताना दिसत आहे. या निवडणुकीच्या आखाड्यात पारनेरचे लंके,दाते,शेळके,श्रीगोंद्याचे जगताप,नागवडे, शेवगावचे घुले, कोपरगावचे काळे,पाथर्डीचे राजळे,ढाकणे, राहुरीचे तनपुरे,श्रीरामपूरचे ससाणे,अकोल्याचे लहामटे असे अनेक दिग्गज आखाड्यात उतरलेले आहेत जिल्हाभर निवडणुकीचा बिगुल वाजला खासदार लंके म्हणजेच शरद पवारांची राष्ट्रवादी आणि सभापती शिंदे हे भाजपचेच त्यातल्या त्यात देवेंद फडणवीसाचे निकटवर्तीय हे लक्षात ठेवण्यासारखे आहे म्हणजेच काय तर ही निवडणूक जिल्हा पातळीवर होणार असली तरी राज्यपातळीवरून लढविली जाणार हे मात्र नक्की !

# महाराष्ट्रातील तरुणांना आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणार–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, दि.२९ : देशाच्या युवा शक्तीला रोजगारक्षम बनविण्यासाठी शिक्षणासोबत कौशल्य विकास, प्रशिक्षण आणि रोजगार यांची सांगड घालणे आवश्यक आहे. केवळ पदवी मिळवणे पुरेसे नसून बदलत्या तंत्रज्ञानानुसार (एआय, सेमीकंडक्टर, क्वांटम कॉम्प्युटिंग) सातत्याने 'अपस्किलिंग' आणि कौशल्य आत्मसात करणे काळाची गरज आहे. जगात २८ हून अधिक देशांमध्ये मनुष्यबळाची मोठी मागणी असून, महाराष्ट्रातील तरुणांना आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे." असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एसएनडीटी) महिला विद्यापीठ येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने 'पंडित दीनदयाल उपाध्याय महारोजगार मेळाव्याचा आज कोकण व नाशिक विभागातील सर्व जिल्ह्यात' ऑनलाईन शुभारंभ करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, महिला व बालविकास मंत्री, अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू प्रो. हेमलता बागला, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा आयुक्त डॉ. अमित सैनी, मुंबई शहरच्या जिल्हाधिकारी आंचल गोयल, व्यवसाय व शिक्षण प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक सतीश सुर्यवंशी, सृजन ट्रस्टचे अध्यक्ष दिपक मुकादम यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, राज्यभरातून ऑनलाईन व प्रत्यक्ष प्रणालीद्वारे हजारो विद्यार्थी मोठ्या




संख्येने उपस्थित होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्हिडीओ संदेशाव्दारे रोजगार मेळाव्याला शुभेच्छा दिल्या. मुख्यमंत्री यांच्या हस्ते सहीदा परमाणिक यांना क्रेवा कॅपीटल सर्व्हिसेस प्रायवेट लिमीटेड बेलापूर व कांती शंभू चव्हाण यांना क्रेवा कॅपीटल सर्व्हिसेस प्रायवेट लिमीटेड कुर्ला येथील या कपंनीकडून नियुक्तीपत्र देण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर 'सेवा संकल्प अभियाना' अंतर्गत या रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून कोकण व नाशिक विभागातील तरुणांना जास्तीत जास्त रोजगार आणि स्वरोजगाराच्या संधी उपलब्ध होतील अशी आशा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या संकल्पनेतील विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण आणि रोजगार ही त्रिसूत्री अत्यंत महत्वाची आहे. पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी मांडलेला 'अंत्योदय' आणि 'एकात्म मानव दर्शन' हा विचार समाजातील शेवटच्या घटकाचा विकास साधणारा आहे.याच विचारावर आधारित शासनाचे कामकाज सुरू आहे."

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, देशामध्ये शिक्षण, प्रशिक्षण आणि रोजगार मानव संसाधनाची निर्मिती हा सगळ्यात महत्वाचा विषय आहे, ज्याच्या आधारावर २०४७चा विकसित भारत आपण तयार करू शकणार आहोत. गरीबी मुक्त, बेरोजगारी मुक्त, रोगमुक्त भारत हे जे आपलं स्वप्न आहे. या स्वप्नाकडे जाण्याकरता खऱ्या अर्थानं शिक्षण, प्रशिक्षण आणि रोजगार या त्रिसूत्रीच्या आधारावर आपल्याला ही व्यवस्था उभी करायची आहे. आज देशातील ६५ टक्के लोकसंख्या ही कार्यक्षम युवाशक्ती आहे. एकीकडे उद्योजकांना कुशल मनुष्यबळाची गरज आहे, तर दुसरीकडे तरुणांना रोजगाराची आवश्यकता आहे. या दोघांना जोडणारा भक्कम दुवा म्हणून हे रोजगार मेळावे काम करत आहेत. बदलत्या तंत्रज्ञानानुसार युवकांनी सातत्याने नवीन कौशल्ये आत्मसात करावीत. युवकांना रोजगार देणारे आणि रोजगार शोधणारे यांच्यातील दुवा म्हणून रोजगार मेळावे महत्वाची भूमिका बजावतात.रोजगार मेळाव्यासाठी १ लाख पेक्षा अधिक नोंदणी झाली: मंत्री मंगलप्रभात लोढा कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले की, मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनानुसार या वेळी केवळ आयटीआयमधील विद्यार्थ्यांपुरते मर्यादित न राहता सर्व स्तरांतील तरुणांसाठी प्रत्येक तालुक्यात किमान तीन लहान रोजगार मेळावे आयोजित केले जात आहेत. केवळ मेळावे न घेता, विद्यार्थ्यांना रोजगार मिळावेत यासाठी ७ दिवसांचे मोफत पूर्व-रोजगार प्रशिक्षण देण्यात आले असून, आतापर्यंत ६१ हजार मुला-मुलींनी हे प्रशिक्षण घेतले आहे. या मेळाव्यासाठी १ लाखांपेक्षा जास्त तरुणांनी नोंदणी केली असून, किमान ७० टक्के तरुणांना रोजगार किंवा स्वरोजगाराशी जोडल्याशिवाय आम्ही थांबणार नाही."

*रोजगारक्षम शिक्षण ही काळाची गरज: मंत्री चंद्रकांतदादा पाटील*

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, जेवढे पदवीधर बाहेर पडतील, तेवढे रोजगाराचे मार्ग निर्माण व्हावेत यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभाग कौशल्य विकास विभागाच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे.युवकांना केवळ रोजगार मेळाव्यात सहभागी करून घेणे हा या उपक्रमाचा उद्देश नाही, तर मुलाखतीला सामोरे जाण्यासाठी त्यांना अधिक सक्षम करणे हा देखील महत्वाचा भाग आहे. त्यासाठी मुलाखत पूर्व प्रशिक्षण, व्यक्तीमत्व विकास, सॉफ्ट स्किल्स, संवाद कौशल्य वाढविणे, व्यवस्थापन कौशल्य विकसित करणे यांसारख्या आवश्यक बाबींचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

*महाराष्ट्राला ग्लोबल एम्प्लॉयमेंट हब बनवणार: मंत्री जयकुमार रावल*

पणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले की, "महाराष्ट्राने आज आशियातील अव्वल गुंतवणूक केंद्र आणि देशाची 'स्टार्टअप कॅपिटल' म्हणून ओळख निर्माण केली आहे. तरुणांना केवळ राज्यातच नव्हे, तर जगभरात कुठेही रोजगाराच्या संधी मिळाल्यास त्यांना आवश्यक भाषा व कौशल्य प्रशिक्षण देऊन परदेशात पाठवण्याची तयारी सरकारने केली आहे. 'मोबिलीटी' प्रकल्पाच्या माध्यमातून कृषी आणि पणन क्षेत्रातही अडीच हजार कोटी रुपये खर्च करून शेतकऱ्यांच्या मुलांना उद्योग व रोजगाराशी जोडले जात आहे."

*कोकण व नाशिक विभागात ४०० पेक्षा जास्त मेळावे*

कोकण व नाशिक विभागातील 12 जिल्ह्यांमध्ये रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले.

# पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचे निर्देश

(पान १ वरुन) पशुधनाची संख्या विचारात घेऊन चाऱ्याची गरज निश्चित करावी. गाय, शेळी, मेंढी आणि अन्य पशुधनासाठी आवश्यक चाऱ्याचे सूक्ष्म नियोजन करून त्याची उपलब्धता व वितरण यावर कृषी आणि पशुसंवर्धन विभागाने संयुक्तपणे लक्ष ठेवावे.शेतीच्या नुकसानीचे पंचनामे करताना कोणताही पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. दुष्काळाच्या काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे सांगत मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी बांधावर जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला असून त्यांच्या समस्या जाणून घेतल्याचे डॉ. विखे पाटील यांनी नमूद केले.*वीजपुरवठा आणि रोजगार हमीच्या कामांना गती*शेतकऱ्यांना अखंडित वीजपुरवठा मिळावा यासाठी महावितरणने सतर्क राहावे. सौर ऊर्जेचा अधिकाधिक वापर करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे. ग्रामीण भागातील नागरिकांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी रोजगार हमी योजनेच्या कामांची व्याप्ती वाढवून अधिकाधिक कामे सुरू करावीत, असे निर्देशही देण्यात आले.दुष्काळाच्या काळात प्रशासनाने संवेदनशीलतेने आणि प्रत्यक्ष परिस्थितीचा अभ्यास करून काम करणे आवश्यक आहे. अधिकाऱ्यांनी मुख्यालयी उपस्थित राहून गावागावात भेटी द्याव्यात, शेतकरी व नागरिकांशी संवाद साधावा आणि त्यांच्या अडचणींवर तातडीने कार्यवाही करावी. कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असा इशारा पालकमंत्र्यांनी दिला.

# कबड्डी मध्ये सलग दुसऱ्यांदा पटकावले सुवर्णपदक!

# जिल्ह्याचे भूमिपुत्र अस्लम इनामदार यांचा पालकमंत्री विखे पाटील यांनी केला सत्कार

शिर्डी, दि. २ (उमाका) आशियाई क्रीडा स्पर्धेत कबड्डी खेळात दुसऱ्यांदा सुवर्णपदक मिळविलेल्या अहिल्यानगरचा भूमिपुत्र अस्लम इनामदार याची खेळातील कारकीर्द सुवर्णविजयी आणि सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याची प्रतिक्रिया जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केली.श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभानचा भूमिपुत्र अस्लम इनामदार याने आशियाई क्रीडा स्पर्धेत कबड्डी संघामध्ये प्रतिनिधित्व करून सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदक पटकावण्याचा मान मिळविला आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अस्लम इनामदार याचा लोणी येथे सत्कार करून त्याचे विशेष अभिनंदन केले.या प्रसंगी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, जिल्हा क्रीडा



अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्यासह अस्लमचे नातेवाईक आणि ग्रामस्थ उपस्थित होते."सातत्यपूर्ण सरावाच्या बळावर क्रीडा क्षेत्रात अस्लम इनामदार आणि त्याच्या संघाने भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवला. हे यश अहिल्यानगरच्या क्रीडा संस्कृतीचे, त्याच्या कुटुंबीयांचे आणि प्रशिक्षकांचे आहे. अहिल्यानगरचा भूमिपुत्र आशियाच्या मैदानावर इतिहास घडवतो, ही सर्वांच्या दृष्टीने अभिमानास्पद घटना आहे," असे विखे पाटील म्हणाले.ग्रामीण भागातील खेळाडू आपल्या मेहनतीने आणि जिद्दीने नावलौकिक मिळवत असल्याचे सांगून, "यापूर्वी अस्लमला प्रथम सुवर्णपदक मिळाले तेव्हा टाकळीभान येथे त्याच्या नागरी सत्कार समारंभास आपण आवर्जून उपस्थित होतो," अशी आठवण त्यांनी सांगितली. अस्लमचे यश हे जिल्ह्यातील खेळाडूंसाठी अतिशय प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले."अनेक खेळाडू जिल्ह्यातून विविध स्पर्धांत सहभागी होत आहेत. शहर आणि ग्रामीण खेळाडूंमधील दरी आता कमी होत आहे. योग्य संधी, प्रशिक्षण आणि प्रोत्साहन मिळाले तर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडू देशाचे नाव उज्ज्वल करू शकतात, हा आत्मविश्वास अस्लम इनामदार याच्या यशाने सर्वांना दिला आहे," असेही मंत्री विखे पाटील म्हणाले.

साप्ताहिक दर्शक
हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संस्थापक संपादक शेख रियाज फजलोद्दीन यांनी दर्शक भवन,726,दिपाली थिएटर समोर,झेंडीगेट रोड,अहिल्यानगर-414001 येथे मुद्रीत करुन येथेच प्रकाशित केले संपादक-शेख रियाज फजलोद्दीन मो.9763030386, कार्य.संपादक-शेख आदिल रियाज मो-7666602660, मुख्य कार्यालय -दर्शक भवन,झेंडीगेट पोलीस चौकी समोर,अहिल्यानगर-414001 महाराष्ट्र इ-मेल- weeklydarshak@gmail.com (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर वादविवाद अहिल्यानगर न्यायकक्षेत) email-darshaknews81@gmail.com

## स्वयंरोजगाराच्या माध्यमातून मराठा तरुणांनी उद्योजक बनावे – वक्त्यांचे आवाहन

अहिल्यानगर, दि. २९ (जिमाका) : स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या ९३ व्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर येथील अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या स्मृतींना अभिवादन करून त्यांच्या सामाजिक व आर्थिक विचारांना उजाळा दिला.मराठा समाजातील युवकांनी पारंपरिक नोकरीच्या संधींपुरते मर्यादित न राहता स्वयंरोजगार व उद्योगाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे. युवकांनी उपलब्ध शासकीय योजना, कर्ज सुविधा आणि महामंडळाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन स्वतःचा व्यवसाय उभारावा तसेच इतरांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, असे आवाहन यावेळी करण्यात आले.कार्यक्रमाची प्रस्तावना जिल्हा समन्वयक परीतोष दरपेल यांनी केली. त्यांनी स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या जीवनकार्याचा आणि विचारांचा आढावा घेतला. स्व. अण्णासाहेब पाटील यांनी समाजातील युवकांच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीसाठी दिलेल्या योगदानाची माहिती त्यांनी यावेळी दिली. तसेच अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या माध्यमातून युवकांना स्वयंरोजगार व उद्योगासाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध योजनांवरही त्यांनी प्रकाश टाकला.

युवकांनी उद्योग, व्यवसाय आणि स्वयं रोजगाराच्या माध्यमातून आपल्या क्षमतांचा विकास करून आर्थिक स्वावलंबन साधावे. बदलत्या आर्थिक परिस्थितीनुसार आवश्यक कौशल्ये आत्मसात करून नव्या संधींचा शोध घ्यावा, असेही वक्त्यांनी सांगितले. कार्यक्रमास महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# युवकांनी बदलत्या काळानुसार नवनवीन कौशल्ये विकसित करावीत– प्राचार्य डॉ. अजय आगरकर





अहिल्यानगर, दि. 29 (जिमाका) : बदलत्या तंत्रज्ञानाच्या आणि रोजगाराच्या स्वरूपानुसार युवकांनी नवनवीन कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे. रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध असून त्या संधींचा प्रभावीपणे लाभ घेण्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्यावर युवकांनी भर द्यावा. युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी अशा रोजगार मेळाव्यांचे नियमित आयोजन होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. अजय आगरकर यांनी केले. राज्यात दि. 17 सप्टेंबर 2026 ते दि. 17 ऑक्टोबर 2026 या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत 'रोजगार महाकुंभ महाराष्ट्र' उपक्रमात शासकीय तंत्रनिकेतन, अहिल्यानगर येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. आगरकर बोलत होते.यावेळी जिल्हा माहिती अधिकारी मुकुंद चिलवंत, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी शैलेंद्र नलावडे यांची प्रमुख उपस्थिती होती.डॉ. आगरकर म्हणाले, रोजगाराच्या संधींचा शोध घेताना युवकांनी आपल्या शैक्षणिक पात्रतेसोबतच व्यावसायिक आणि तांत्रिक कौशल्यांमध्ये सातत्याने वाढ करणे आवश्यक आहे. उद्योगक्षेत्रातील बदल लक्षात घेऊन आवश्यक कौशल्ये आत्मसात केल्यास उपलब्ध रोजगाराच्या संधींचा अधिक प्रभावीपणे लाभ घेता येईल. युवकांनी अशा रोजगार मेळाव्यांमध्ये सहभागी होऊन उपलब्ध संधींची माहिती घ्यावी आणि आपल्या कौशल्यांना अनुरूप रोजगाराची निवड करावी. जिल्हा माहिती अधिकारी मुकुंद चिलवंत यांनी युवकांना मार्गदर्शन करताना रोजगार मेळाव्याचे महत्त्व विशद केले. जिल्ह्यातील युवकांना त्यांच्या परिसरातच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'रोजगार महाकुंभ महाराष्ट्र' उपक्रम राबविण्यात येत असून युवकांनी या उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.'सेवा संकल्प अभियान' आणि 'रोजगार महाकुंभ महाराष्ट्र'च्या माध्यमातून युवकांना कौशल्यविकास, रोजगाराच्या संधी आणि उद्योगक्षेत्राशी जोडण्याच्या प्रक्रियेला चालना मिळत आहे. युवकांनी उपलब्ध संधींचा लाभ घेत बदलत्या रोजगार विश्वानुसार स्वतःला अधिक सक्षम करण्यासाठी सातत्याने कौशल्यविकास करावा, असे आवाहन शैलेंद्र नलावडे यांनी केले. या उपक्रमाच्या माध्यमातून राज्यातील जिल्हा, तालुका तसेच औद्योगिक परिसरांमध्ये रोजगार मेळावे आणि प्लेसमेंट ड्राइव्हचे आयोजन करण्यात येत आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील युवकांना विविध क्षेत्रांतील रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे.

# पैशाचा पाऊस पाडण्याचे आमीष दाखवून फसवणारी टोळी पकडली

नगर – पैशाचा पाऊस पाडण्याचे आमीष दाखवून फसवणूक करणारी तिघांची टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नगर एमआयडीसी परिसरात पकडली आहे. या टोळीकडून ९२.०९ लाखांच्या बनावट नोटांसह १ कोटी ३ लाख ७४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांचे आदेश आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या सूचनेनुसार पोलीस उपनिरीक्षक संदीप दरवडे व पोलीस अंमलदार विजय ठोंबरे, गणेश लोंढे, शाहीद शेख, संदिप पवार, विष्णु भागवत, सुयोग सुपेकर, संतोष खैरे, बाळासाहेब गुंजाळ, फुरकान शेख, प्रशांत राठोड व भाग्यश्री भिटे यांचे विशेष पथक २९ सप्टेंबर रोजी एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करत असताना, गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, गणेश दिलीप शेवाळे व त्याचे काही साथीदार भारतीय चलनाच्या बनावट नोटा स्वतःच्या फायद्यासाठी व्यवहारात वापरण्याच्या उद्देशाने बाळगून आहेत. मिळालेल्या या खबरीच्या आधारे पथकाने गणेश शेवाळे राहत असलेल्या घरात छापा टाकून घरझडती घेतली.यावेळी घराच्या खोलीत जिन्याखालील पिशवीमध्ये भारतीय चलनाच्या बनावट नोटा तसेच बनावट नोटा तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कोऱ्या कागदांचे बंडल आढळून आले.

या कारवाईदरम्यान पथकाने गणेश दिलीप शेवाळे (वय ३३, रा. कोर्टाजवळ, अशोक नगर, बारामती, जि. पुणे), सुमित विकास चंदनशिवे (वय २५, रा. तांदुळवाडी, बारामती, जि. पुणे) आणि सुरज वसंत कांबळे (वय २७, रा. झारगडवाडी, बारामती, जि.पुणे) या तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यांच्याकडून ५०० रुपये दर्शनी मूल्य असलेल्या १८,४१९ बनावट नोटा (एकूण ९२,०९,५०० रुपयांच्या बनावट नोटा), ५ मोबाईल आणि एक व्हॉक्सवॅगन कंपनीची कार (क्र. एमएच–१४–डीएफ–०३६५) असा १ कोटी ३ लाख ७४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ताब्यात घेतलेल्या आरोपींकडे कसून चौकशी केली असता, मुख्य आरोपी गणेश शेवाळे याने या बनावट नोटा त्याचे इतर साथीदार प्रताप धुमाळ (रा. बोल्हेगाव,नगर), अशोक भीमराज दारकुंडे (रा. गजानन कॉलनी, एमआयडीसी,नगर) या दोघांच्या मदतीने अशोक दारकुंडेच्या फॉर्च्युनर गाडीमधून अम्मु (रा. मालेगाव, जि.नाशिक) याच्याकडून २५ हजार रुपये देऊन आणल्याची कबुली दिली. तसेच, हे आरोपी भोळ्या भाबड्या नागरिकांना 'पैशाचा पाऊस पाडतो' असे आमिष दाखवून, त्यांच्या मनात अंधश्रद्धा निर्माण करून विश्वास संपादन करत आणि नागरिकांकडून पैसे उकळून त्यांची फसवणूक करण्यासाठी या बनावट नोटांचा वापर करत असल्याचे तपासात उघडकीस आले आहे.याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १७९, १८०, ३१८(४),३(५) सह महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा प्रतिबंधक कायद्याचे कलम ३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, फरार आरोपींचा शोध घेतला जात आहे.

# जिल्हा बँक निवडणुकीतील बिनविरोधच्या राजकारणाविरोधात वंचित बहुजन आघाडी आक्रमक; निवडणूक लढविण्याचे आवाहन

नगर – अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बिनविरोधच्या हालचालीं वरून राजकीय वातावरण तापले आहे. सहकार चळवळीच्या भवितव्याचा प्रश्न उपस्थित करत वंचित बहुजन आघाडीने या निवडणुकीत मैदानात उतरण्याची भूमिका जाहीर केली आहे. बँकेवरील प्रस्थापित राजकीय शक्तींच्या वर्चस्वाला विरोध करून सहकार, संविधान आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी निवडणूक लढविण्याचे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांनी केले आहे.जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही जिल्ह्याच्या ऐतिहासिक सहकार चळवळीचा महत्त्वाचा आधारस्तंभ असल्याचे सांगत साठे यांनी बँकेच्या कारभारा वर गंभीर आरोप केले. त्यांच्या म्हणण्यानुसार, बँकेच्या एकूण ६ हजार ८९६ कोटी रुपयांच्या कर्जापैकी सुमारे ४० टक्के, म्हणजेच २ हजार ७०० कोटी रुपयांचे कर्ज १२ मोठ्या साखर कारखान्यांना देण्यात आले आहे.

या कारखान्यांकडे ५७८ कोटी रुपयांहून अधिक थकबाकी असल्याचा दावाही त्यांनी केला. योगेश साठे लहान शेतकऱ्यांच्या कज 'वसुली साठी कठोर भूमिका घेतली जाते; मात्र मोठ्या कर्जदारांकडील थकबाकी बाबत वेगळी भूमिका घेतली जात असल्याचा आरोप साठे यांनी केला. दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना अपेक्षित मदत मिळत नसल्याचा आरोप करत त्यांनी प्रस्थापित राजकीय नेत्यांनी सरकार विरोधात भूमिका घेण्याऐवजी स्वतःच्या राजकीय हितसंबंधांना प्राधान्य दिल्याचा दावा त्यांनी केला.

बिनविरोध निवडणुकी च्या माध्यमातून गावपातळी वरील विकास सोसायट–यांचे खच्चीकरण होऊन सभासद आणि कार्यकर्त्यांचा लोकशाही सहभाग कमी होण्याची शक्यता असल्याचा आरोपही साठे यांनी केला.जिल्ह्यातील शेतकरी, विकास सोसाय–ट्यांचे सभासद आणि सुशिक्षित तरुणांनी सहकार चळवळीच्या भवितव्याचा विचार करून एकत्र यावे, असे आवाहन योगेश साठे यांनी केले. बिनविरोधच्या नावाखाली होणाऱ्या राजकीय एकाधिकार शाहीला विरोध करण्या साठी वंचित बहुजन आघाडी निवडणुकीत पूर्ण ताकदीने उतरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सहकार क्षेत्रातील लोकशाही प्रक्रिया आणि संविधानिक मूल्यांचे रक्षण करण्या–साठी ही निवडणूक महत्त्वाची असल्याचा दावा करत, बँकेच्या मतदारांनी निवडणूक प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन साठे यांनी केले.

## जिज्ञासा प्रयोगशीलता अन् संशोधनातून फार्मसीत यशाची नवी वाट - व्हिजन लॅब हैदराबादचे शास्त्रज्ञ डॉ. अप्पाजी मांढरे यांचे शांतिनिकेतन कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये मार्गदर्शन

नगर - ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता, जिज्ञासा आणि संशोधनाची क्षमता मोठ्या प्रमाणात आहे. योग्य दिशा, आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख आणि संशोधनाच्या संधी मिळाल्यास ग्रामीण विद्यार्थी फार्मसी व औषध संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करू शकतात, असे प्रतिपादन हैदराबाद येथील व्हिजन लॅबचे शास्त्रज्ञ डॉ. अप्पाजी मांढरे यांनी केले.शांतिनिकेतन कॉलेज ऑफ फार्मसी, धोत्रे बु. येथे विद्यार्थी व शिक्षकांसाठी आयोजित विशेष मार्गदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी त्यांनी फार्मसी क्षेत्रातील बदलते स्वरूप, औषधनिर्मिती उद्योगातील संधी, संशोधन व विकास, आधुनिक विश्लेषणात्मक तंत्रज्ञान, गुणवत्ता नियंत्रण तसेच उच्च शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातील करिअरच्या विविध संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.फार्मसी म्हणजे केवळ औषध तयार करण्यापुरते मर्यादित क्षेत्र नसून त्यामध्ये फॉर्म्युलेशन डेव्हलपमेंट, ड्रग डिलिव्हरी सिस्टीम, रिसर्च अँड डेव्हलपमेंट, क्लिनिकल रिसर्च, बायोटेक्नॉलॉजी आणि अकादमिक रिसर्च अशा विविध क्षेत्रांमध्ये करिअरच्या संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले."प्रश्न विचारा, प्रयोग करा आणि संशोधनाकडे वळा" तसेच विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासक्रमापुरते ज्ञान मर्यादित न ठेवता आपल्या आजूबाजूच्या समस्या ओळखून त्यावर वैज्ञानिक पद्धतीने उपाय शोधण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन मांढरे यांनी केले. संशोधनासाठी मोठ्या शहरातच असणे आवश्यक नाही. जिज्ञासा, सातत्य, प्रयोगशीलता आणि योग्य मार्गदर्शन या गोष्टी संशोधनासाठी अधिक महत्त्वाच्या आहेत, असे त्यांनी सांगितले.ग्रामीण भागातील नैसर्गिक साधनसंपत्ती, स्थानिक वनस्पती, पारंपरिक ज्ञान आणि स्थानिक आरोग्यविषयक समस्या यांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करून नाविन्यपूर्ण संशोधन करता येऊ शकते, याकडेही त्यांनी विद्यार्थ्यांचे लक्ष वेधले.विद्यार्थ्यांशी थेट संवाद मार्गदर्शन सत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी फार्मसी क्षेत्रातील करिअर, संशोधना साठी आवश्यक कौशल्ये, उद्योगातील संधी, प्रयोगशाळेतील कामकाज आणि उच्च शिक्षण यासंदर्भात विविध प्रश्न संस्कृती वाळुंज, शेखर गिऱ्हे, क्षितिजा पवार, स्नेहल मंचरे, प्रांजली सासवडे या विद्यार्थ्यांनी विचारले. डॉ. मांढरे यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना सविस्तर उत्तरे देत त्यांना संशोधनाची दिशा समजावून सांगितली.या संवादामुळे विद्यार्थ्यांना फार्मसी क्षेत्राकडे केवळ पारंपरिक करिअर म्हणून न पाहता संशोधन व नवोपक्रमाचे व्यापक क्षेत्र म्हणून पाहण्याची प्रेरणा मिळाली. महाविद्यालयाच्या वतीने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उद्योग, संशोधन संस्था आणि तज्ज्ञ व्यक्तींशी संवाद साधण्याच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशा मार्गदर्शन कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती आणि व्यावसायिक कौशल्ये विकसित होण्यास मदत होते.

## तुळजाभवानीच्या शारदीय नवरात्र महोत्सवाच्या तयारीला वेग

नगर - महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेच्या शारदीय नवरात्र महोत्सव २०२६ च्या धार्मिक विधींच्या तयारीला वेग आला असून,उत्सवातील विविध धार्मिक कार्यक्रम आणि विधी नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी तुळजापूरला रोजीआढावा बैठक संपन्न झाली अशी माहिती बैठकीला उपस्थित असलेले अहिल्यानगर येथील तुळजाभवानी पलंगाचे मानकरी गणेश वसंत पलंगे,अभिषेक अनंत पलंगे(नगरचे तेली पलंगवाले) यांनी दिली. श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शारदीय नवरात्र महोत्सव चा उत्सव दि. ११ ऑक्टोबर ते २७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत होणार आहे. या पार्श्वभूमीवर मंदिराच्या प्रशासकीय कार्यालयात बैठक पार पडली.नवरात्रौत्सवात पार पडणारे विविध धार्मिक विधी, मानकरी, पुजारी मंडळ ,तसेच संबंधित विभागांमस्ये समन्वय राखून सर्व विधी वेळापत्रकानुसार आणि सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने बैठकीत चर्चा करण्यात आली. शारदीय नवरात्र महोत्सवाच्या तयारीबाबत मंदिर संस्थानच्या प्रशासकीय कार्यालय कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत उप विभागीय अधिकारी ऑकार देशमुख यांच्यासह अहिल्यानगर येथील श्री तुळजाभवानी पलंगाचे मानकरी गणेश वसंत पलंगे, अभिषेक अनंत पलंगे (नगरचे तेली पलंगवाले) व पालखी चे मानकरी भगत परिवार सदस्य व अनेक अधिकारी उपस्थित होते. ११ ऑक्टोबर रोजी देवीची मंचकी निद्रा संपून त्याच दिवशी उत्तर रात्री दोन वाजता देवीची सिंहासनावर प्रतिष्ठापना होऊन दि. २० ऑक्टोबर रोजी महानवमीनिमित्त तुळजाभवानीची नित्योपचार अभिषेक, पूजा होऊन दुपारी बारा वाजता होमावर आजाबलीचा धार्मिक विधी पार पडणार आहे.

# पाणीटंचाई निवारणासाठी युद्धपातळीवर उपाययोजना करा – मंत्री गुलाबराव पाटील

मुंबई, दि. ३० : संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोर नियोजन, जलस्रोतांचे बळकटीकरण, नाला खोलीकरण व जलसंधारणाची कामे वेगाने पूर्ण करणे, 75 टक्क्यांपेक्षा अधिक पूर्ण झालेल्या पाणीपुरवठा योजना तातडीने सुरू करणे आणि टँकरवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यावर भर द्यावा. तसेच सर्व जिल्ह्यांचे टंचाई आराखडे 15 ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करून अनधिकृत पाणी उपसा तातडीने रोखावा, असे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.छत्रपती संभाजीनगर, नाशिक आणि पुणे विभागातील संभाव्य पाणीटंचाईच्या अनुषंगाने सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या आढावा बैठकीत मंत्री श्री. पाटील बोलत होते. बैठकीस राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, अपर मुख्य सचिव पराग जैन नैनुटिया, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच पाणीपुरवठा, जलसंधारण, जलसंपदा, कृषी आणि संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.मंत्री श्री. पाटील म्हणाले की, पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर उपाययोजना करण्याऐवजी संभाव्य टंचाईचा अंदाज घेऊन आतापासूनच नियोजन करणे आवश्यक आहे. तलाव, धरणे, विहिरी आणि अन्य जलस्रोतांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोर नियोजन करून त्याचा काटकसरीने वापर करावा.



टंचाईची तीव्रता वाढण्यापूर्वीच आवश्यक पर्यायी स्रोत, टँकर आणि इतर व्यवस्था सज्ज ठेवाव्यात.75 टक्क्यांपेक्षा अधिक पूर्ण योजनांना प्राधान्यज्या पाणीपुरवठा योजनांची कामे ७५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक पूर्ण झाली आहेत आणि उपलब्ध स्रोतांतून पाणीपुरवठा करणे शक्य आहे, अशा योजना तातडीने कार्यान्वित कराव्यात. नळ जोडणी, पाइपलाइन, टाकीची जागा, प्रशासकीय मान्यता किंवा अन्य तांत्रिक अडचणी असल्यास त्या संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या समन्वयाने तातडीने दूर कराव्यात.टँकर सुरू असलेल्या गावांतील प्रलंबित पाणीपुरवठा योजनांना विशेष प्राधान्य देऊन त्या युद्धपातळीवर पूर्ण कराव्यात. टँकर सुरू करण्यापेक्षा टँकरची गरजच भासणार नाही, अशी कायमस्वरूपी व्यवस्था निर्माण करण्यावर शासनाचा भर आहे, असे मंत्री श्री. पाटील यांनी स्पष्ट केले.जलस्रोत बळकटीकरण आणि नाला खोलीकरणाला गतीटंचाईग्रस्त भागात नाला खोलीकरण, गाळ काढणे, बंधारे, शोषखड्डे, रिचार्ज शाफ्ट, विहिरींची दुरुस्ती व खोलीकरण, विहीर अधिग्रहण, नवीन विंधन विहिरी तसेच जलसाठवण क्षमता वाढविण्याची कामे प्राधान्याने करावीत. जलसंधारणाच्या कामांसाठी जिल्हा नियोजन समिती, सीएसआर, खनिकर्म निधी, जलजीवन मिशन, ग्रामपंचायत, पाटबंधारे आणि अन्य उपलब्ध निधींचे अभिसरण करावे. कोणत्या जलस्रोताला तातडीने बळकटीकरणाची आवश्यकता आहे, यानुसार कामांना प्राधान्यक्रम देऊन अतिसंवेदनशील स्रोतांवर प्रथम काम करावे, असे निर्देश त्यांनी दिले. छत्रपती संभाजीनगर विभागातील शिरपूर पॅटर्न तसेच पुणे विभागातील सातारा जिल्ह्यातील जलसंधारणाच्या कामांचे दस्तऐवजीकरण करून त्याचा अनुभव राज्यातील इतर जिल्ह्यांमध्येही वापरण्याच्या सूचना मंत्री श्री. पाटील यांनी दिल्या.अनधिकृत पाणी उपसा तातडीने रोखानाशिक विभागातील संभाव्य टंचाईच्या पार्श्वभूमीवर जलस्रोतांमधून होणारा अनधिकृत पाणी उपसा तातडीने रोखावा. जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून संबंधित विभागांनी प्रत्यक्ष पाहणी करून अनधिकृत जोडण्या अथवा पाणी उपसा आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी. पाण्याचा प्रत्येक थेंब जपणे आवश्यक आहे, असे मंत्री श्री. पाटील यांनी सांगितले. पाणीपुरवठ्याशी संबंधित कोणतीही छोटी अडचण प्रलंबित ठेवू नये. क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष गावांना भेटी देऊन परिस्थितीची पाहणी करावी आणि अडचणी तातडीने जिल्हाधिकारी अथवा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून त्यांचे निराकरण करावे.15 ऑक्टोबरपर्यंत टंचाई आराखडे पूर्ण करा सर्व जिल्ह्यांचे टंचाई आराखडे 15 ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करावेत. पर्जन्यमान, भूजल पातळी, उपलब्ध पाणीसाठा, सुरू असलेले टँकर आणि जलस्रोतांची स्थिती लक्षात घेऊन संभाव्य टंचाईग्रस्त गावांचे आतापासूनच नियोजन करावे. ऑक्टोबर ते डिसेंबर, जानेवारी ते मार्च आणि एप्रिल ते जून या कालावधीसाठी स्वतंत्र नियोजन करून आवश्यक निधी, मनुष्यबळ आणि साधनसामग्री उपलब्ध ठेवावी. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली पाणी पुरवठा, कृषी, रोजगार हमी, जलसंधारण व जलसंपदा विभागांचा समन्वय साधून नियमित बैठका घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.




शब-ए-विसाल है गुल कर दो इन चराग़ों को
ख़ुशी की बज़्म में क्या काम जलने वालों का
दाग़ देहलवी

काही शब्दांचे अर्थ शब-ए-विसाल - महबूब से मिलने की रात
चराग़ों-दीप, दीपक, दिया, लैम्प बज़्म-महफ़िल

# नेत्यांच्या बोलण्यात एकसूत्रता नसल्याने अर्ज घेण्यास गर्दी

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याची चर्चा सुरू असली तरी संबंधित सर्व प्रमुख नेत्यांच्या बोलण्यामध्ये एकसूत्रता राहिलेली नसल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे उमेदवारी अर्जांसाठीची गर्दी पाहता सभासदांनी स्वतःहून फॉर्म घेण्यास सुरुवात केली असल्याचे दिसते आहे, असा दावा विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी आज येथे केला. सभासदांनी मोठ्या प्रमाणात उमेदवारी अर्ज घेतलेले आहेत. ५४१ फॉर्म आत्तापर्यंत सभासदांनी घेतलेले आहेत. यावरून निवडणूक बिनविरोध होणार की नाही, हे स्पष्ट होतं, असे सूचक भाष्यही त्यांनी केले. जर एखाद्या गोष्टीचा निर्णय करणार असतील तर सर्वांना सोबत घेतलं पाहिजे. सर्वांना विचारात घेऊन करायला हवं, असे भाष्यही त्यांनी केले.अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या २१ जागांसाठीची निवडणूक प्रक्रिया सध्या सुरू आहे. ही निवडणूक लढवण्याचे विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी मागेच जाहीर केले होते व त्याअनुषंगाने जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातील ज्येष्ठ नेत्यांच्या भेटीगाठीही त्यांनी घेतल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, सभापती प्रा. शिंदे यांनी आज बुधवारी (दि.३० सप्टेंबर) सकाळी १०.३० वाजता जिल्हा बँक निवडणुकीचा कोरा उमेदवारी अर्ज घेतला. यासाठी ते जिल्हा बँकेच्या चाहुराणा-मार्केट यार्ड शाखेत आले होते. आता ते प्रत्यक्ष उमेदवारी कधी दाखल करतात याची उत्सुकता आहे.उमेदवारीचा अर्ज घेतल्यानंतर



सभापती प्रा. शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँक आशिया खंडातील सर्वात मोठी बँक आहे. तिचे कार्यक्षेत्रही मोठे आहे. बँकेच्या ठेवीदेखील मोठ्या प्रमाणात आहेत आणि ते चांगलेच आहे. त्यामुळे सर्वसामान्य शेतकर्यांना पीक कर्ज वितरणही चांगले झाले आहे. बँकेची आर्थिक स्थिती चांगली आहे आणि तिचे कामही चांगले आहे. त्यामुळे ठेवीदार आणि शेतकर्यांचे आर्थिक संरक्षण करणे व त्यांना पाठबळ देणे आपले काम आहे. दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे मागणी केल्याबरोबर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने मदत करण्याची तयारी दर्शवली आहे. त्याचाही फायदा बँकेला निश्चित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.पालकमंत्र्यांची भूमिका प्रतीक्षेत : जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक लढवायची आहे. पण बिनविरोधच्या चर्चांमुळे माझ्या मनामध्ये अजून तोच प्रश्न निर्माण झाला आहे. पालकमंत्र्यांची भूमिका अजूनही स्पष्ट झालेली नाही. महायुतीमध्येही पालकमंत्र्यांनी भूमिका स्पष्ट केलेली नाही. त्यांच्या मतानुसार त्यांना बिनविरोध संदर्भातील बैठकीबाबत काही माहीत नाही असेही ना. राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले आहेत. शिवसेना एकीकडे बैठक घेत आहे आणि म्हणून त्यासंदर्भात सभापती म्हणून मला भूमिका घेण्याची वेळ अजून आली की नाही असा प्रश्न मला पडला आहे, असे भाष्य करून सभापती प्रा. शिंदे म्हणाले, संगमनेर येथे मीटिंग झाल्यानंतर मला माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांचा फोन आला होता.

# नगर व श्रीरामपूर येथे एकाच दिवशी जुगार व गावठी हातभट्टीवर १३ छापे



नगर – नगर जिल्ह्यातील अवैध धंद्यांची माहिती काढून कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेस दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस अंमलदारांचे दोन विशेष पथक तयार करून त्यांना अवैध व्यावसायिकांवर कारवाई करण्याबाबत सूचना व मार्गदर्शन देऊन रवाना केले होते. २८ सप्टेंबर रोजी या पथकाने कोतवाली, श्रीरामपूर शहर व श्रीरामपूर तालुका पोलीस स्टेशन हद्दीत जुगार आणि गावठी हातभट्टी सुरू असलेल्या ठिकाणांची माहिती काढून एकाच दिवशी एकूण १३ ठिकाणी छापे कारवाई केली. पथकाने केलेल्या या कारवाईमध्ये संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये एकूण १३ गुन्हे दाखल करण्यात आले असून, या कारवाईदरम्यान एकूण १८ हजार ९९० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यात कोतवाली पोलीस स्टेशन हद्दीत जुगाराचे ४ गुन्हे दाखल करून ४ हजार ९३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला, तसेच गावठी हातभट्टीचा १ गुन्हा दाखल करून ३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला गेला. याशिवाय श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन हद्दीत जुगाराचे ६ गुन्हे दाखल करून ७ हजार ९२० रुपयांचा मुद्देमाल आणि श्रीरामपूर तालुका पोलीस स्टेशन हद्दीत जुगाराचे २ गुन्हे दाखल करून २ हजार ६४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे व त्यांच्या पथकातील पोलीस अंमलदार गणेश धोत्रे,योगेश भिंगारदिवे, पंकज व्यवहारे, सतीष भवर, अतुल लोटके, अभिजीत अरकल, रमीजराजा आतार, आजिनाथ पाखरे यांनी केली

साप्ताहिक दर्शक
e-mail - weeklydarshak@gmail.com

IF UNDELIVERED PLEASE RETURN TO
DARSHAK
DARSHAK BHAVAN,
726,OPP.DEPALI
THEATER ZENDIGATE,
AHMEDNAGAR-414001
MAHARASHTRA

Visit us
www.darshaknews.com
email- darshaknews81@gmail.com
weeklydarshak@gmail.com

TO,______________________________
________________________________
________________________________